ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ पुणें, बुधवार तारीख १४ मे, १९५२ अंक १०

## विविध माहिती

**नाटकावरील कर रद्द**—मध्य प्रदेश सरकारनें नाटकाच्या प्रयोगावर घेण्यांत येणारा करमणुकीचा कर ह्यापुढें घेण्यांत येऊं नये असा निर्णय घेतला आहे. मध्य प्रदेशांत तिकिटाच्या किंमतीच्या ५० टक्के करमणूक कर घेतला जात असे.

**भारताची इराणला मदत**—भारतीय सरकारच्या शेती आणि अन्नखात्यांतील एक तज्ज्ञ, टोळांचा बंदोबस्त करण्यासाठी नुकताच इराणला रवाना झाला. इराणच्या उत्तर भागांत टोळांनीं पिकांना धोका निर्माण केला आहे. इराण सरकारच्या विनंतीवरूनच हा अधिकारी पाठविण्यांत आला आहे.

**ग्रामोद्योग डॉलर्स मिळवून देतो**—उत्तर प्रदेश सरकारनें डॉलर्स मिळवून देणाऱ्या ग्रामोद्योगांच्या निर्यात-मालाकडे अधिक लक्ष देण्यास सुरवात केली आहे. गेल्या वर्षी फरुकाबाद येथील ग्रामोद्योगांनीं २९ लाख रुपयांचे डॉलर्स मिळवून दिले होते. मध्यंतरीं कांहीं निर्यात व्यापाऱ्यांनीं कमी दर्जाचा माल पाठविल्यामुळें मागणी घटली होती. परंतु आतां सरकारनें मालाच्या दर्जाची हमी देणारे शिक्के मारण्यास प्रारंभ केल्यामुळें पुन्हां जम बसूं लागला आहे.

**रशिआंतील वृत्तपत्र व्यवसाय**—सोव्हिएट रशिआंत सध्यां सुमारें ८,००० वृत्तपत्रें प्रकाशित होतात आणि त्या सर्वांच्या मिळून ४ कोटी प्रती खपतात. रशिआंत सोव्हिएट राज्यपद्धती सुरू झाल्यापासून १० लाख पुस्तकांच्या सुमारें १४०० कोटी प्रती खपल्या. त्यांपैकीं ९० कोटी प्रती मार्क्स, एंजल्स, लेनिन व स्टॅलिन ह्यांच्या ग्रंथांच्या होत्या.

**४ मजल्यांचें गॅरेज**—बर्मिंगहॅम येथील एक कंपनी ४० हजार पौंड खर्चून ४ मजल्यांचें एक गॅरेज बांधणार आहे. ह्या गॅरेजमध्यें ४०० मोटारी ठेवण्याची सोय करण्यांत येईल. मोटारी लिफ्टनें चढविण्यांत व उतरविण्यांत येतील. मजुरांचा व सामुग्रीचा तुटवडा असल्यामुळें इमारतीचें बांधकाम सावकाश चाललें आहे.

**अणु-शक्तीवर चालणारें विमान**—अणुशक्तीवर विमानें चालविण्याचे प्रयोग आतां बरेच पुढें गेले आहेत असें समजतें. आतां हे प्रयोग केवळ तात्त्विक चर्चेच्या स्वरूपांत राहिलेले नाहींत. विमानाच्या बांधणीची माहिती मात्र गुप्त आहे. असें विमान तयार झाल्यावर कोठेंहि न थांबतां पृथ्वीप्रदक्षिणा करतां येईल.

**जयपूर येथील कारखाना**— जयपूर येथें असलेला सोडिअम सल्फेटचा कारखाना गेले कांहीं दिवस अडचणीमुळें बंद होता. आतां तो पुन्हां चालू करण्यांत आला आहे. ह्या द्रव्यासाठी नवीन उपयोग शोधून काढण्याचा प्रयत्न राजस्थान सरकार करीत आहे.

**जुगारापायीं ८०० कोटी रुपये**— गेल्या वर्षी ब्रिटिश नागरिकांनीं घोड्यांच्या शर्यती, कुत्र्यांच्या शर्यती आणि फुटबॉलच्या स्पर्धा ह्यांवर सुमारें ८०० कोटी रुपये खर्च केला, असा अंदाज करण्यांत आला आहे. घोड्यांच्या शर्यतींपेक्षा फुटबॉलच्या स्पर्धेंत लोकांनीं अधिक पैजा लावल्या.

**उत्तर प्रदेशांतील हातमागाचा धंदा**— उत्तर प्रदेश सरकारनें नवीन प्रकारचे हातमाग तयार करवून त्यावर निराळ्या प्रकारचें कापड विणविण्यास सुरवात केली आहे. सरकारचीं हातमागाचीं केंद्रें असून त्यांत २,००० विणकर काम करतात. गेल्या वर्षी राज्यांतील हातमागाच्या धंद्यानें ८,८६,५५० रुपये किंमतीचें कापड तयार केलें, व मजुरांना रोजगार म्हणून २.४१ लाख रुपये दिले.

**नुकसान-भरपाईची विचित्र मागणी**— सुदानमधील एक मजूर आपला पगार घेऊन स्नान करण्यासाठी नदींत उतरला होता. त्यानें आपल्या पगाराच्या नोटा कोटाच्या खिशांतच ठेवल्या होत्या. स्नान करीत असतां इकडे काठावर एका गाईनें त्या नोटा खाऊन टाकल्या. त्यावर मजुरानें मालकाकडे नुकसान-भरपाईची मागणी केली. त्याचें म्हणणें असें कीं मालकानें पगार नोटांत न देतां नाण्यांत द्यावयास पाहिजे होता.

**सुरतेचें नवें रेल्वे स्टेशन**—सुरत स्टेशन नव्यानें बांधण्यांत येत असून तें काम येत्या ऑगस्टमध्यें पूर्ण होईल. नव्या इमारतीला सुमारें ७ लाख रुपये खर्च येईल. सध्यांची इमारत १८७० सालीं बांधण्यांत आलेली आहे. ती न पाडतांच नवीन काम करण्यांत आलें आहे.

**राजपुतान्याचें पसरणारें वाळवंट**— राजस्थानमधील वाळवंट आणखी पसरत जाऊं नये म्हणून राजस्थानच्या पश्चिम सरहद्दीवर ५ मैल रुंद आणि ४०० मैल लांब असा जंगलाचा पट्टा निर्माण करण्यांत यावा अशी सूचना भारतीय सरकारला करण्यांत आली आहे. असा पट्टा निर्माण केल्यास सिंधमधील वाळवंटावरून येणारे उष्ण वारे थांबतील.

### दि युनियन बँक ऑफ कोल्हापूर लि., कोल्हापूर

वरील बँकेस १९५१ सालीं २३,३०० रु. नफा झाला. रिझर्व्ह फंड ६,००० रु. बँड डेट व रिझर्व्ह ऑर कॉन्टिन्जन्सी फंड १,००० रु., इन्व्हेस्टमेंट फंड १,५०० रु., ४% करमाफ डिव्हिडंड ६,४५७ रु., इन्कम टॅक्स तरतूद ८,३०० रु., अशी नफा-वाटणी करण्यांत आली. बँकेनें व्याज, डिस्कौंट, कमिशन, ब्रोकरेज वगैरेचे १,३७,८८८ रु. मिळविले. दिलेलें व्याज, पगार, घसारा, इत्यादि सर्व वजा जातां २३,३०० रु. नफा उरला. एकूण ताळेबंद २७ लक्ष रुपयांचा असून त्यांत इतर बँकांचीं देणीं वगैरे नाहींत. ( चेअरमनः शेठ चुनिलाल उर्फ बाबुभाई मार्शिंगजी परमार. व्हा. चेअरमनः शेठ एम्. बी. लोहिया. मॅ. डायरेक्टरः गोपाळ गणेश श्रीखंडे. )

संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | १,६२,६५० | रोकड व कॉल डि. | ८,६८,९७३ |
| रिझर्व्ह व इतर फंड | ७९,५०० | इन्व्हेस्टमेंट्स. | ४,११,७५५ |
| ठेवी | २३,०९,५८४ | कर्जे | ११,२६,८३७ |
| निव्वळ नफा | २३,३०० | बँक बिल्डिंग | १,१०,४७१ |

### दि बँक ऑफ कराड लि., कराड

१९५१ वर्षी बँकेस २४,१२४ रु. निव्वळ नफा झाला, ५,००० रिझर्व्ह फंड, १,५०० रु. सिक्युरिटीज फ्लक्चुएशन फंड, ४% करमाफ डिव्हिडंडसाठीं ८,७०० रु. आणि इन्कम टॅक्सची तरतूद ९,३००० रु. अशी वाटणी करण्यांत आली. ता. २६ फेब्रुवारी १९५१ रोजीं बँकेनें जिल्ह्याचे ठिकाणीं सातारा येथें आपली शाखा उघडली. ( चेअरमन : लक्ष्मण महादेव देशपांडे, एक्स-एम. एल. सी. मॅनेजर : महादेव विनायक खंडकर )

संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | २,१७,६७५ | रोकड व बँ. शि. | २,४५,४१७ |
| रिझर्व्ह व इतर फंड | ३२,५०० | इन्व्हेस्टमेंट्स | ७,९३,३६९ |
| ठेवी | १७,७४,१५६ | कर्जे | १०,३६,००८ |

### दि बँक ऑफ कोंकण लि., मालवण

वरील बँकेस १९५१ वर्षी ६,७५९ रु. निव्वळ नफा झाला, त्यांत शिलकी नफा १,५५६ रु. मिळविला म्हणजे नफावाटणीस ८,३१६ रु. येतात. १३५२ रु. रिझर्व्ह फंड, २,९६० रु. कराची तरतूद, २,००० रु. संशयित व बुडीत कर्ज रिझर्व्ह, १,५०० रु. इनव्हेस्टमेंट फ्लक्च्युएशन रिझर्व्ह, अशी त्याची वांटणी करून ५०४ रु. पुढील हिशेबांत ओढण्यांत आले आहेत. मुंबई ( ८, हमाम स्ट्रीट ), पनवेल, रत्नागिरी, वेंगुर्ला, कुडाळ, सावंतवाडी व बांदे येथें बँकेच्या शाखा आहेत. कोंकण भागांत बँकिंगची सोय उपलब्ध करून देण्याची बँकेची कामगिरी अत्यंत महत्त्वाची आहे. ( चेअरमन : आत्माराम भास्कर पंडित, बी. ए., जे. पी. मॅ. डायरेक्टर : एम. वाय. मांडारकर, बी. एजी. )

संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ५,१३,३६० | कॅश व इतर बँकांत | २,८६,९९८ |
| रिझर्व्ह व इतर फंड | २१,८७० | इन्व्हेस्टमेंटस | १०,६२,२२० |
| ठेवी | २०,८३,०६१ | कर्जे | १२,७५,१८० |


## ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay



## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.**

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी—विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबाजवळ. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.




# अर्थ

बुधवार, ता. १४ मे, १९५२





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## शेतीस कर्जपुरवठा : रिझर्व्ह बँकेचें उपकारक धोरण

शेतीला कर्ज पुरविण्याचे कामीं रिझर्व्ह बँकेची जबाबदारी गेल्या कांहीं वर्षांत बरीच वाढली आहे. १९४७–४८ पूर्वीहि रिझर्व्ह बँक कायद्यांत त्याबाबत तरतुदी होत्याच, परंतु बँकेनें तिकडे प्रत्यक्ष पैशाची मदत देण्याच्या दृष्टीनें लक्ष पुरविलें नाहीं. आतां मात्र, रिझर्व्ह बँकेनें ह्या संबंधांतील धोरण बरेंच सहानुभूतीचें ठेवलें आहे आणि तिनें प्रांतिक सहकारी बँकांना सुमारें ८ कोटी रुपये कर्जाऊ दिलेले आहेत. रिझर्व्ह बँक शेतकऱ्याला व्यक्तिशः कर्ज देऊं शकत नाहीं आणि त्यांच्या प्रत्यक्ष गरजेच्या मानानें रिझर्व्ह बँकेनें दिलेलीं कर्जें अल्प असलीं, तरी तीं नव्या दृष्टिकोनाचीं निदर्शक आहेत. दीर्घ मुदतीचीं व मध्यम मुदतीचीं कर्जें रिझर्व्ह बँकेच्या कक्षेंत येत नाहींत; त्यामुळें अल्पमुदतीच्या कर्जाचाच विचार रिझर्व्ह बँक करते. ह्यासंबंधांतील प्रगतीची कल्पना खालीं दिलेल्या तक्त्यावरून येईल:—

**प्रांतिक सहकारी बँकांना रिझर्व्ह बँकेनें दिलेलीं कर्जें**

( आंकडे लक्ष रुपयांचे )

| बँक | १९४६–४७ | १९४७–४८ | १९४८–४९ | १९४९–५० | १९५०–५१ | १–७–५१ ते १५–२–५२ |
|---|---|---|---|---|---|---|
| मद्रास | …… | १५·० | ९१·८ | १५६·० | २२४·५ | २९०·६ |
| मुंबई | १·० | …… | ६·५ | ६६·० | २१६·० | ५३५·५ |
| उत्तर प्रदेश | ०·५ | १·८ | ४·४ | ०·७ | २·५ | १२·२ |
| मध्य प्रदेश | …… | …… | …… | ३४·६ | ५३·१ | २०·५ |
| ओरिसा | …… | …… | …… | १३·४ | २६·७ | १५·० |
| प. बंगाल | …… | …… | …… | …… | १५·० | २५·० |
| एकूण | १·५ | १६·८ | १०२·७ | २७०·७ | ५३७·८ | ८९८·८ |

मुंबई आणि मद्रास ह्या दोनच राज्यांतील प्रांतिक सहकारी बँकांना ९ कोटी रुपये कर्जापैकीं ८½ कोटी रुपये कर्ज मिळालेलें आहे, ही गोष्ट तक्त्यावरून सहज लक्षांत येण्याजोगी आहे. तेथील सहकारी चळवळीची प्रगति इतर ठिकाणच्या चळवळीच्या मानानें पुष्कळच ज्यास्त झालेली आहे, हें त्याचें कारण आहे. रिझर्व्ह बँक कायद्याप्रमाणें, तिच्या कर्जासाठीं दोन लायक सह्या लागतात त्या ह्या दोन राज्यांत ( १ ) मध्यवर्ती सहकारी बँक व ( २ ) प्रांतिक बँक ह्यांच्या चालू शकतात. इतर राज्यांतील सहकारी संस्थांच्या सह्या रिझर्व्ह बँकेस पुरेशा वाटत नसल्यानें, तेथील सरकारांच्या गॅरंटीच्या बळावरच कर्जपुरवठा केला जातो. सहकारी चळवळीच्या प्रगतीचें पाऊल सर्व ठिकाणीं सारखें नसल्यामुळें, मुंबई–मद्रासमध्येंच रिझर्व्ह बँकेच्या कर्जाचा फायदा ज्यास्त मिळतो. मोसमांतील शेतकामास किंवा पीक–विक्रीस १७ ( २ ) ब आणि १७ ( ४ ) क ह्या कलमाखालीं रिझर्व्ह बँक केंद्रीय सहकारी बँकेमार्फत सहकारी चळवळीस विना–तारण कर्जें देते, आणि १७ ( ४ ) अ कलमाखालीं सरकारी रोख्यांच्या आणि लँड मॉर्गेज बँक डिबेंचर्सच्या तारणावर कर्जें देण्यांत येतात. १७ ( ४ ) ड कलमानें मालावरील मालकी हक्काच्या निदर्शक कागदांचे तारणावर कर्जें देण्याची सोय केलेली आहे; परंतु लायसेन्स दिलेलीं कोठारें त्यासाठीं हवींत; त्यांच्या अभावीं ह्या कलमाखालील सोयींचा उपयोग घेणें अशक्य झालें आहे. १७ (४) ह्या कलमाखालीं वर्गीलप्रमाणें कर्जें देण्याचें धोरण बँकेनें आतां सढळ केलें आहे आणि त्यासंबंधांतील तंत्रहि सोपें केलें आहे. ह्याचा सुपरिणाम केंद्रीय सहकारी बँकांना दिलेल्या कर्जांत वाढ होण्यांत झाला आहे.

### नव्या सोयी व सवलती

गेल्या चार–पांच वर्षांत रिझर्व्ह बँकेनें शेती कर्जपुरवठ्याचे कामीं काय प्रकारें पुढें पाऊल टाकलें आहे, ह्याचें दिग्दर्शन येथें केलें आहे:—( १ ) रिझर्व्ह बँक कायद्याच्या १७ ( २ ) ब कलमाप्रमाणें द्यावयाच्या कर्जाची कमाल मुदत ९ महिने होती, ती आतां १५ महिने करण्यांत आली आहे. तथापि, सामान्यतः १२ महिने मुदतीच्या परत फेडीची बोली केली जाते. कायद्याच्या १७ ( ४ ) अ आणि १७ ( ४ ) क कलमाखालीं सहकारी बँकांनीं घेतलेलीं कर्जें मोसमी शेतकामासाठीं अथवा पीक विक्रीसाठीं वापरण्यांत आलीं, तर १२ महिनेपर्यंत त्यास मुदत दिली जाते. ( २ ) कायद्याच्या १७ ( २ ) अ ह्या कलमाखालीं बिलस डिस्कौंट करण्याची सोय शेड्यूल्ड बँकांपुरतीच मर्यादित होती, ती कायदा दुरुस्त करून सहकारी बँकांनाहि देण्यांत आली आहे. ( ३ ) ‘अ’ आणि ‘ब’ वर्गांतील सोसायट्यांनाच रिझर्व्ह बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाचा फायदा मिळूं शकत होता. ‘क’ वर्गांतील ज्या सोसायट्यांची रजिस्ट्रार शिफारस करील, अशा सोसायट्यांनाहि तो फायदा आतां मिळूं शकतो. ( ३ ) पूर्वीं, रिझर्व्ह बँकेनें सहकारी बँकांना दिलेलीं सर्व कर्जें ३० सप्टेंबरपूर्वीं परत करावीं लागत असत. बारा महिन्यांची पुरी मुदत आतां त्यांना दिली जाते; फक्त कर्जाच्या कमाल मर्यादेच्या आंत, त्यांचीं एकूण कर्जें असलीं म्हणजे झालें. कॅश–क्रेडिट खात्याप्रमाणें सहकारी बँका आपलें रिझर्व्ह बँकेतील कर्जखातें आतां चालवूं शकतात, ही मोठीच सोय झाली आहे. ( ४ ) कर्ज मागणाऱ्या सहकारी बँकेनें पुरवावयाच्या तपशिलाच्या बाबी रिझर्व्ह बँकेच्या अॅ. के. खात्यानें निश्चित ठरवून टाकल्या आहेत. त्यामुळें, कर्जाच्या कमाल मर्यादा अर्जापासून एका आठवड्याच्या आंत ठरवून टाकणें शक्य होतें. परंतु, त्यासंबंधांतील सूचनांचें पालन झालें नाहीं, तर होणारा विलंब अपरिहार्य आहे. ( ५ ) पीक विक्रीसाठीं दिलेल्या कर्जावर व्याजाचा दर बँक रेटपेक्षां १% कमी, असा १९४२ मध्यें ठरविण्यांत आला. १९४४ पासून मोसमी शेतकामाच्या कर्जासहि ही सवलत मिळूं लागली. १९४६ सालीं रिबेट १% चा १½% करण्यांत आला. आतां बँक रेट ३½% झाला असला, तर शेतीस कर्जपुरवठ्याचा दर बँक-रेटच्या पेक्षां २% कमी ठेवण्यांत आला आहे. म्हणजे, व्याजाचे दर इतर क्षेत्रांत पुष्कळच वाढले असले तरी तो दर

**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि.** (स्थापना १९१८)
शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.
दरमहा १ रु. पासून १०० रुपयांपर्यंत हप्त्याची **बचत योजना.** व्याज ३ ते ३½ टक्के.
हेड ऑफिस- गिरगांव, मुंबई.

## मालाच्या किंमती

लेखक:—गो. गं. साठे, ए. बी. आय. (लंडन)
C/o बँक ऑफ पूना लि.

मनुष्याला रोजच्या गरजा भागविण्यास लागणारें धान्य व इतर वस्तु यांचे भाव लढाईपूर्वी फारच कमी होते. प्रत्यक्ष लढाईला सुरवात जरी १९३९ सालीं झाली असली तरी १९४२ सालापासून भाववाढीस सुरवात झाली. लढाई संपली तरी भाव वाढ चालूच राहिली.

ह्या वाढीला आळा घालण्याच्या प्रयत्नांत व्याजाचा दर वाढविला गेला. वास्तविक, व्याजाचा दर खाजगी व्यवहारांत यापूर्वीच वाढला होता. परंतु रिझर्व्ह बँकेनें बँक-रेट वाढविल्यानें व्यापारावर त्याचा अप्रत्यक्ष परिणाम दिसूं लागला व त्याचीच परिसीमा व्यापारक्षेत्राची गेल्या २ महिन्यांत (फेब्रुआरी-मार्च) जी परिस्थिति झाली, त्या मंदीच्या लाटेमध्यें आपणांस पहावयास मिळाली.

सरकारमान्य (शेड्यूल्ड बँका) सावकारी पेढ्या यांच्यावर रिझर्व्ह बँकेनें व्याजाचा दर वाढविला म्हणून जो परिणाम झाला त्यापेक्षां खूप जास्त एकंदर बाजाराच्या देवघेवींवरून आणि त्यांतील वायदे बाजाराच्या उच्चांकावरून झाला. मूलतः हजार रुपये किंमतीच्या मालावरून व्यवहार मात्र लाखाचे होत असल्यानें, फक्त भावांतील फरकाची देवघेव करून व्यापारी वर्गानें पुष्कळ नफा मिळविला. ही नफा मिळविण्याची वृत्ति युद्धोत्तर काळांत चांगली पोसली गेली आणि व्यापारी वर्गास सरकारी सवलती मिळत गेल्यानें त्यांचें चांगलेंच फावलें. बाजार भाव प्रत्येक दिवशीं वाढत चालले, त्यामुळें साठा करण्याची वृत्ति सहाजिकच बळावली. हुंड्यांचा व्यवहार बँकांना किफायतशीर असल्यानें हुंडी-खरेदीचा व्यवहार बँकांनीं सढळ हातानें केला. बाजार चढत्या मार्गावर असल्यानें कोठल्याही परिस्थितींत तूट येण्याचा संभव नव्हताच.

अर्थाअर्थी कांहीं संबंध नसलेल्या कोरियन युद्धाची संधि साधून किंमती अधिक चढविल्या गेल्या. अमेरिकेस कच्च्या मालाची निर्यात यामुळें झाली आणि जागतिक युद्धाच्या अपेक्षेमुळें युद्धोपयोगी सामुग्रीचें उत्पादन पाश्चात देशांत सुरू झालें. पुढें ही युद्धजन्य स्थिति पालटली. याचा परिणाम हिंदी निर्यातीवर झाला आणि परदेशांतील मागणींत चांगलीच घट झाली. त्याचबरोबर लोकांच्या वृत्तीमधील बदल आणि खरेदी करण्याची कुवत मोठ्या प्रमाणावर कमी झाल्यानें व्यापारास दुसरा धक्का बसला. युद्धकाळांत व नंतरही कांहीं दिवस नोकऱ्यांची सुलभता आणि संपत्तीची सुबत्ता असल्यानें जनतेंत खर्च करण्याची वृत्ति बळावली होती. तीन रुपये शेरानें साखर मिळाली तरी घेऊन ठेवा, असें म्हणणारे लोक असल्यानें सहाजिक भावांत वाढ होत असे. ही परिस्थिति पालटली. कर्जे देण्यांत बँकांनीं हात आखडते घेतले आणि पूर्वीप्रमाणें कर्जे मिळणें कठीण झालें. त्यामुळें संचय करणें अशक्य झालें. सरकारी रोख्यांचे भाव घसरले आणि त्याचप्रमाणें सोनेंचांदी बाजार.

एका क्षेत्रांतील किंमती घसरल्या कीं त्याचा परिणाम दुसऱ्या क्षेत्रांत होतो, या न्यायानुसार इतर मालाच्या किंमती खालीं आल्या. साठा करण्याच्या वृत्तीमुळें व्यापाऱ्यांचें बरेंच भांडवल मालांत गुंतलें होतें. त्यांचे भाव खालीं आल्यानें बँकांचें देणें देण्याकरितां येईल त्या भावांत माल विक्रीस काढला. लोकांची खरेदी करण्याची ताकद कमी झाल्यानें व चलनवाढीस आळा बसल्यानें गिऱ्हाइकांचा अभाव व्यापारीवर्गास तीव्रपणें जाणवला व त्यामुळें किंमती आणखी खालीं आल्या; त्यामुळें बँकांनीं कर्जफेडीचा तगादा सुरू केला आणि मार्जिन भरण्याबद्दल निकड केली. सौदे बाजारांतील सेटलमेंटमध्यें आलेली तूट भरून काढण्याकरितां हाताशीं पैसा न राहिल्यानें ज्यांच्या जवळ बँकेंत शिल्लक (ठेवी) होती ती काढली गेली. याचा परिणाम बँकांच्या ठेवी कमी होण्यांत झाला. पैशाच्या तंगीमुळें मोठे व्यापारी नुकसानींत आल्यानें चिल्लर व्यापारी साफ झाले. पुष्कळ व्यापारी लोकांनीं सरकारला या बाबतींत दोष दिला व सरकारनें त्यांना जागरूक करावें अशी त्यांनीं अपेक्षा प्रतिपादन केली. परंतु वायदेबाजाराला जुगाराचें स्वरूप देऊन नफा आणि अधिक नफा करण्याच्या वृत्तीमुळें व्यापारी वर्गानें सामान्य परिस्थितीकडे कानाडोळा केला आणि त्याचें फळ त्यांना भोगावयास लागलें. सरकारनें निर्यात बंधनें शिथील केलीं आणि बाजार स्थिर करण्याचा प्रयत्न केला व तो सफळ होऊं पहात आहे.

परंतु या सर्व भानगडींत अन्न धान्याच्या किंमती स्थिर अगर वाढत होत्या. त्याही इतर मालाचे भावाबरोबर खालीं आल्या, इतर वस्तूंना भाव नसल्यानें शेतकऱ्यांचा कल हळद, ऊंस, कापूस ह्यांच्या उत्पादनाकडे यापुढें न राहतां ज्वारी, बाजरी वगैरे अन्न धान्याकडे राहील असें वाटूं लागलें आहे. परंतु शेतकऱ्यांची भूमिका व्यापारावर आधारलेली नसल्यानें उत्पादनवाढीकडे नफ्याच्या प्रमाणांत लक्ष दिलें जात नाहीं. पुरवठा कमी झाल्यावर भाव वाढतील आणि मागणी वाढत राहून भाव वाढत राहतील हीं अर्थशास्त्राचीं तत्त्वें येथें कितपत लागू पडतील, याची शंका आहे. कारण, मूलतः शेतजमीन कमी. त्यांत पाणीपुरवठ्याच्या योजना अपुऱ्या किंबहुना देशाच्या मानानें कांहींच नाहींत. बाहेरील धान्याची आयात व धान्याच्या किंमतींत ५० टक्के वाढ ही योजना नसल्याचें दर्शवितात. कागदावरील योजना प्रत्यक्षांत उतरूं शकत नाहींत, कारण त्या योजना करणारास मागील घडामोडींचे तुलनात्मक आकडे मिळवावयास अवधी लागतो व ज्या आकड्यावर अगर माहितीवर धोरण ठरविलें जातें त्या माहितींत दरम्यानच्या काळांत बदल होत जातो व सदरच्या माहितीवरचें धोरण यशस्वी होत नाहीं.

किंमती स्थिर करण्याकरितां सट्टेबाजीला आळा घालण्यांत सरकार यशस्वी झालें आहे त्याचप्रमाणें निर्यात व्यापारानें, व कमी उत्पादनानें भाव वाढणार नाहींत ही जर खबरदारी घेतली तर सरकारचें धोरण पूर्णपणें दूरदृष्टीचें व किंमती स्थिर करण्यांत यशस्वी झाल्याचें दिसून येईल.

### म्हैसूरमधील सहकारी चळवळीस श्री. सरय्या ह्यांचें मार्गदर्शन

हसन येथें भरलेल्या म्हैसूर राज्याच्या ३८ व्या सहकारी परिषदेचें अध्यक्षस्थान इंडियन को-ऑपरेटिव्ह युनियनचे प्रेसिडेन्ट व मुंबई प्रां. सहकारी बँकेचे चेअरमन, श्री. आर. जी. सरय्या ह्यांनीं विभूषिलें होतें. त्यांनीं आपल्या भाषणांत प्रथम म्हैसूरमधील सहकारी पुढाऱ्यांचा गौरवपर उल्लेख करून, त्या राज्यांतील सहकारी चळवळीच्या प्रगतीचा आढावा घेतला; आणि तेथील चळवळीच्या कांहीं प्रश्नांचें विवेचन करून उपयुक्त सूचना केल्या. तेथील लँड मॉर्गेज बँकिंगच्या प्रसाराबद्दल ( प्रां. सहकारी लँड मॉर्गेज बँक + ७९ प्राथमिक लँड मॉर्गेज बँका ) समाधान व्यक्त केलें. केंद्रीय ( अपेक्स ) बँकेच्या पुनर्रचनेबद्दल त्यांनीं सल्ला दिला. प्लॅनिंग कमिशनच्या योजनेच्या सदर्भातील सहकाराचें स्थान त्यांनीं स्पष्ट करून सांगितलें, तें योग्यच होतें. कारण, ह्यापुढील कांहीं काळांतील आपलें आर्थिक जीवन प्लॅनिंग कमिशनच्या शिफारशींवर अवलंबून रहाणार आहे. भांडवल पुरवठा, पिकाचें उत्पादन व त्याची विक्री ह्यांची सांगड सहकारी चळवळीमार्फत नीट घातली जाण्याचें अगत्यहि त्यांनीं स्पष्ट केलें आणि म्हैसूर राज्यानें सहकाराच्या वाढीसाठी कोणत्या दिशेनें पाऊल टाकावें, ह्याचा तपशील हि सांगितला. सहकारी चळवळीची स्वायत्तता आणि सरकार-पुरस्कृत आर्थिक नियोजन, ह्यांचा मेळ घालण्याचा अवघड प्रश्न आतां उपस्थित झाला आहे, आणि त्यासंबंधांत मि. जी. डी. एच. कोल, सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ, ह्यांच्या "दि ब्रिटिश को-ऑपरेटिव्ह मुव्हमेंट इन ए सोशलिस्ट सोसायटी" ह्या प्रकाशनांतील मताचा दाखला त्यांनीं दिला. श्री. सरय्या ह्यांच्यासारख्या तज्ञ, अनुभवी व तारतम्यानें विचार करणाऱ्या सहकारी नेत्याच्या नेतृत्वाचा म्हैसूरमधील सहकारी कार्यकर्त्यांना लाभ झाला, व श्री. सरय्या ह्यांनींहि योग्य असाच सल्ला दिला, हें उचितच झालें.

---

### दहा रुपयांच्या फाटक्या नोटेचा जय

मुंबईतील एक नागरिक मि. वॉर्डन ह्यांनीं दहा रुपयांची एक फाटकी नोट रिझर्व्ह बँकेकडे नेली आणि तींबद्दल नव्या नोटेची मागणी केली. बँकेनें सदर नोट चिंधड्या झालेली आणि अपूर्ण आहे असें कारण दाखवून तिचा नाश केला आणि नवी नोट देण्याचें नाकारलें. ह्यावर मि. वॉर्डन ह्यांनीं स्मॉल कॉझेस कोर्टांत दावा लावला. त्याचा निकाल बँकेविरुद्ध लागून मि. वॉर्डन ह्यांना दाव्याचा खर्च आणि नोटेचे १० रुपये देण्याचा हुकूम करण्यांत आला. निकाल-पत्रकांत स्मॉल कॉझेस कोर्टानें असें म्हटलें आहे कीं प्रतिवादीनें नोटेचा नाश करावयास नको होता; कारण ह्याबाबत वादीनें प्रतिवादीशीं पत्रव्यवहार चालू ठेवला होता आणि ही बाब कोर्टांत नेण्याचा आपला मनोदयहि कळविला होता. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिआ नोट फंड रूल्स मधील १७ व्या नियमाप्रमाणें ज्या नोटेबद्दल हक्क सांगण्यांत येत असेल ती तशीच सुरक्षित ठेवण्याचें बंधन घालण्यांत आलें आहे; मग दाव्याचा निकाल कांहींहि होवो. मूळची नोट नाहींशी केली गेल्यामुळें ती बनावट होती ह्या बँकेच्या म्हणण्याचा पडताळा पहाण्याची संधिच कोर्टाला मिळाली नाहीं. अशा परिस्थितींत, सदर नोट एकाच दहाच्या नोटेचें तीन तुकडे जोडून तयार केली होती हें वादीचें म्हणणें कोर्टानें मान्य केलें, आणि बँकेला पैसे देण्याचें नाकारण्याचा हक्क नव्हता असा निकाल दिला.


ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड, ओगलेवाडी

## नोटीस

वरील कंपनीच्या भागीदारांची एकतिसावी वार्षिक साधारण सभा ओगलेवाडी येथील कंपनीच्या रजिस्टर्ड ऑफिसमध्यें रविवार ता. १ जून सन १९५२ रोजीं दोन प्रहरीं ३-३० वाजतां खालील कामकाजाचा विचार करणेसाठीं भरणार आहे.

( १ ) डायरेक्टर्स यांनीं केलेला रिपोर्ट व ता. ३१-१२-१९५१ अखेरचा हिशोब तपासनिसांनीं तपासलेला ताळेबंद व नफा-तोटापत्रकें स्वीकारून त्यांस मंजुरी देणें.

( २ ) आर्टिकल्स ऑफ असोसिएशन कलम १०६ प्रमाणें श्री. पी. एन्. आगटे, श्री. एन्. व्ही. गोगटे व मेजर सरदार भाऊसाहेब पाटणकर हे बोर्ड ऑफ डायरेक्टर्स-वरील आपल्या जागा पाळीप्रमाणें सोडीत असून त्याच जागीं तीन डायरेक्टर्सची निवड करावयाची आहे. जागा सोडणारे डायरेक्टर्स पुन्हां निवडून येण्यास पात्र असून ते त्या जागासाठीं उभे आहेत.

( ३ ) चालू सालासाठीं ऑडिटर्स नेमून त्यांचा मुशाहिरा ठरविणें.

( ४ ) याखेरीज ऐनवेळीं जीं कामें चेअरमन सभेपुढें मांडतील त्यांचा विचार करणें.

कंपनीचीं शेअर ट्रॅन्स्फर बुकें ता. १५ मे ते ३१ मे १९५२ अखेर ( दोन्ही दिवस धरून ) बंद राहतील.

ओगलेवाडी,<br>जि उ. सातारा<br>ता. २४ मार्च ५२

बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे हुकमावरून,<br>एस्. पी. ओगले आणि कं.<br>मॅनेजिंग एजंट्स.

सूचनाः-आपल्या पत्त्यांत कांहीं फेरबदल झाल्यास तो कृपा करून कंपनीकडे सत्वर कळवावा.


---

राजघाटावर गांधी म्युझिअम— राजघाटाजवळील ४० एकर जमीन महात्मा गांधी निधीसाठी देण्यांत आली आहे. ह्या जागेवर गांधी म्युझिअम बांधण्यांत येणार आहे. दिल्ली इम्प्रुव्हमेंट ट्रस्टनें ही जागा वरील कारणासाठीं देण्याचें ठरविलें.


## महाराष्ट्र सहकारी विद्यालय, पुणें

या विद्यालयाचे वर्ग ता. १ जुलै १९५२ पासून नं. ५ बैरामजी जिजिभाई रोड, पुणें १, येथें सुरू होणार आहेत. या विद्यालयांत सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर, असिस्टंट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर, खरेदी-विक्री संघाचे मॅनेजर व विविध कार्यकारी सोसायट्यांचे सेक्रेटरी या दर्जाच्या नोकरवर्गास लागणारें शिक्षण देण्यांत येतें. हा अभ्यासक्रम पुरा करून 'को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा' मिळविणाऱ्यांना सहकारी खात्यामध्यें नोकरीसाठी विशेष पसंती देण्यांत येते. मॅट्रिक पास झालेल्या विद्यार्थ्यांना व सहकारी संस्था व खातें येथील नोकरवर्गास प्रवेश दिला जातो. उमेदवारांनीं दि. १५ जून १९५२ चे आंत अर्ज करावेत.

कृ. वा. देवधर,<br>सुपरिंटेंडेंट,<br>महाराष्ट्र सहकारी विद्यालय<br>५ बैरामजी जिजिभाई रोड, पुणें १.

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें

—: शाखा :—

| | |
|---|---|
| (१) अमरावती. | (११) कल्याण. |
| (२) दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई. | (१२) खडकी. |
| (३) चाळीसगांव ( पू. खा. ) | (१३) कोल्हापूर. |
| (४) दादर. | (१४) कोपरगांव. |
| (५) डेक्कन जिमखाना, पुणें नं. ४. | (१५) नाशिक. |
| (६) धुळें ( प. खा. ) | (१६) रत्नागिरी. |
| (७) गिरगांव, मुंबई नं. ४. | (१७) सीताबर्डी, नागपूर ( म. प्र. ) |
| (८) हुबळी. | (१८) सोलापूर ( मुरारजी पेठ ) |
| (९) हैद्राबाद ( दक्षिण ). | (१९) सोलापूर ( फलटण गल्ली ). |
| (१०) नवी पेठ, जळगांव ( पू. खा. ) | (२०) सांगली. |

## दि. ३१ डिसेंबर, १९५१ रोजींची परिस्थिति दाखविणारीं संक्षिप्त पत्रकें

ताळेबंद

### भांडवल व देणें

| | रु. आ. पै |
|---|---|
| मागणी केलेलें व वसूल झालेलें भांडवल<br>प्रत्येकीं रु. ५० चे ६४,००० भाग प्रत्येकीं रु. २५ प्रमाणें मागणी केलेले व वसूल झालेले ... | १६,००,०००—०—० |
| भागांपोटीं आगाऊ भरलेले | १५०—०—० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | ५,१७,०००—०—० |
| ठेवी व इतर खातीं<br>मुदतीच्या ठेवी ६९,९२,७२६-३-०<br>सेव्हिंग्ज बँक खातीं १,१२,९१,५८५-६-१०<br>चालू व कौंटिजन्सी खातीं वगैरे ७७,४६,३७५-२-१ | २,६०,३०,६८६—१२—१ |
| बिल्स पेएबल | २,५६,७४०—८—६ |
| वसुलीसाठीं आलेलीं बिलें ( येणेंकडे दाखविल्याप्रमाणें ) | १७,८७,७६९—६—१ |
| इतर लायबिलिटीज्<br>मागणी न केलेलें डिव्हिडंड ९,६८७-७-५<br>रिबेट ऑन बिल्स डिस्काउंटेड ९३६-९-०<br>ब्रँच ॲडजस्टमेंटस् २,९७,०९९-२-१ | ३,०७,७२३,—१—४ |
| ॲक्सेप्टन्सेस, एंडॉर्समेंटस व इतर ऑब्लिगेशन्स ( येणेंकडे दाखविल्याप्रमाणें ) | ४,२५,५५०—०—० |
| नफातोटा खातें—<br>मागील ताळेबंदांतून पुढें ओढलेली रक्कम ५३,१९९-८-५<br>१९५१ सालचा निव्वळ नफा (ज्यावर इन्कम् टॅक्स देणेंचा असा) २,३९,६५०-२-६ | २,९२,८४९-१०-११ |
| कॉन्टिन्जन्ट लायबिलिटीज<br>बँकेच्या इन्व्हेस्टमेंटमधील जॉईंट स्टॉक कंपनीच्या अंशतः मागणी केलेल्या भागावरील (सबसिडिअरी कंपनीचे शेअर्स धरून) न भागविलेली रक्कम १,३६,९००-०-० | |
| एकूण | ३,१२,१८,४६९—८-११ |

### जिंदगी व येणें

| | रु. आ. पै |
|---|---|
| रोख व रिझर्व्ह बँकेकडे आणि इंपिरिअल बँकेकडे असलेली शिल्लक | ३३,७३,६५३—८—२ |
| इतर बँकाकडील शिल्लक— चालू खात्यांत... | ४,४०,१२८—८—४ |
| मनी ॲट कॉल ॲंड शॉर्ट नोटीस | १,००,०००—०—० |
| इन्व्हेस्टमेंटस्—खरेदी किंमत<br>प्रांतिक व मध्यवर्ती सरकारचे कर्जरोखे व ट्रस्टी सिक्युरिटीज्, शेअर्स, डिबेंचर्स व इतर इन्व्हेस्टमेंट ...<br>( बाजारभावानें किंमत ९१,५९,०६४-६-२ ) | ९७,७५,८१४—५—३ |
| अडव्हान्सेस | १,४३,१५,५७१-१४—३ |
| वसुलीसाठीं पाठविलेलीं बिलें ( देणेंकडे दाखविलेप्रमाणें ) ... | १७,८७,७६९—६—१ |
| अक्सेप्टन्सेस, एन्डॉर्समेंटस व इतर लायबिलिटीज् ( देणेंकडे दाखविलेप्रमाणें ) ... | ४,२५,५५०—०—० |
| कायम भांडवली खर्च (वजा घसारा)<br>( इमारत व इमारतीची जागा, सेफ डिपॉझिट व्हॉल्ट, खरेदी किंमत ) | ४,९३,१५८—१४—३ |
| फर्निचर व फिक्स्चर्स (वजा घसारा) | ९७,६०५-१२—३ |
| इतर असेट्स्— स्टँप्स, इनकम्‌टॅक्स अगाऊ भरलेला व व्याज घेतांना कापलेला, व्याज—इन्व्हेस्टमेंट्स् वरील चढलेलें, ॲडव्हान्स दिलेल्या रक्कमा, महाराष्ट्र एक्झिक्युटर आणि ट्रस्टी कंपनीचे शेअर्स ( अंशतः मागणी केलेले ): | ४,०९,२१७—४—४ |
| एकूण | ३,१२,१८,४६९—८-११ |

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें.

### दि. ३१ डिसेंबर १९५१ अखेर संपणाऱ्या वर्षाचें नफातोटापत्रक

| खर्च | रु. आ. पै | जमा ( संशयित व बुडित कर्जासाठीं आणि आवश्यक कारणांसाठीं चालू सालीं केलेली तरतूद वजा करून ) | रु. आ. पै |
|---|---|---|---|
| ठेवींवर व बँकांकडून घेतलेल्या रकमांवर दिलेलें व्याज ... | ३,९२,०५३-१३-९ | व्याज, डिस्काउंट, डिव्हिडंड वगैरे ... | १०,१६,६११—९-० |
| पगार, भत्ते, प्रॉ. फंड वगैरे ... | ३,२४,६८८—०-२ | कमिशन, हुंडणावळ व ब्रोकरेज ... | १,०४,९८३,-१५-९ |
| डायरेक्टरांची व स्थानिक सल्लागार समित्यांच्या सभासदांची फी व भत्ते | ७,७६०—०-० | इमारतींचें भाडें (म्युनिसिपल कर व इतर खर्च वजा जातां ) ... | २,०५३—४-९ |
| ऑफिसभाडें. कर, विमे, दिवाबत्ती वगैरे. ... | ३३,६६८—५-३ | इतर | |
| लॉ चार्जेस | ४,८५१-१३-० | ट्रॅन्सफर फीज् ... | ३४८—२-० |
| टपाल, तार, टेलिफोन व स्टँप्स् ... | १९,७२३—९-६ | लॉकर्सचें भाडें ... | ४,३२५-१२-० |
| ऑडिट फी ... | २,०००—०-० | | |
| घसारा व मिळकतीचा दुरुस्ती खर्च | ९,५२०— ३-६ | | |
| स्टेशनरी, छपाई, जाहिरात वगैरे ... | ६०,४२६—१ ११ | | |
| इतर खर्च | | | |
| किरकोळ व प्रवास खर्च | ३५,९८०—९-११ | | |
| निव्वळ नफा, ताळेबंदास ओढलेला ( ज्यावर इन्कम-टॅक्स देणेचा असा ) ... | २,३९,६५०—२-६ | | |
| | ११,२८,३२२-११-६ | | ११,२८,३२२-११-६ |

स. वि. धर्माधिकारी,
अकौंटंट

चिं. वि. जोग,
मॅनेजर

धों. कृ. साठे,
अध्यक्ष.

गो. वृ. आपटे, बी. ए., जी. डी. ए., एफ. सी. ए., चार्टर्ड अकौंटंट.
कुलकर्णी आणि खानोलकर, चार्टर्ड अकौंटंट्स्, मुंबई.
} ऑडिटर्स.

श्री. गो. मराठे, न. ग. पवार, मा. रा. जोशी, शं. ल. किर्लोस्कर, मा. वी. शहा, फ. दो. पदमजी, भा. म. गुते } संचालक.

### पॉवर अल्कोहलच्या उत्पादनाला मर्यादा

पॉवर अल्कोहल तयार करून पेट्रोलचा खप कसा कमी करतां येतो हें उत्तर प्रदेशांतील माहितीवरून चांगलें दिसून येतें. ह्या राज्यांत पेट्रोलमध्यें पॉवर अल्कोहलचें मिश्रण करून मोटारीसाठी जळण वापरण्यांत आल्यानें गेल्या तीन वर्षांत सुमारें १२४ लाख गॅलन पेट्रोल वांचलें आहे. द्रव्याच्या भाषेंत, जवळ जवळ तितक्याच रुपयांच्या किंमतीची परकीय हुंडणावळ वांचली असा ह्याचा अर्थ होतो. मोटारीला जळण म्हणून वापरण्यांत येणाऱ्या वरील मिश्रणांत ६० भाग पेट्रोल आणि २० भाग पॉवर अल्कोहल असें प्रमाण असतें. उत्तर प्रदेशांतील रामपूर जिल्हा सोडून इतर सर्व जिल्ह्यांत पेट्रोलवरील नियंत्रण उठल्यापासून वरील मिश्रण वापरण्यांत येऊं लागलें. उत्तर प्रदेशाप्रमाणेंच दिल्ली राज्यांतहि हा प्रयोग करण्यांत येत आहे. दिल्ली मागोमाग पंजाब, विंध्यप्रदेश, पेप्सु, इत्यादि राज्यांतहि ही व्यवस्था चालू करण्यांत येणार आहे. ह्या राज्यांतून मिश्रण तयार करण्याची यंत्रसामुग्री बसविण्यांत आली आणि सांठ्याची व्यवस्था झाली कीं पेट्रोल ऐवजीं मिश्रित पेट्रोल वापरण्यांत येऊं लागेल, असें समजतें.

उत्तर प्रदेशांतील पॉवरअल्कोहलचें उत्पादन हळूहळू वाढत आहे. १९४९–५० सालीं ३४ लाख गॅलन उत्पादन झालें होतें, तें १९५१–५२ सालीं ४६·५ लाख गॅलन झालें. राज्यांत पॉवर अल्कोहल गाळण्याचे १२ कारखाने आहेत. हे सर्व कारखाने शक्य असलेलें जास्तींत जास्त उत्पादन करीत आहेत असें मात्र नाहीं. सरकारच्या मदतीनें जितकें पॉवरअल्कोहल बाजारांत आणतां येईल तेवढेंच ते आणीत आहेत. पॉवरअल्कोहल उत्पन्न करण्यासाठी उसाच्या रसाच्या मळीचा कच्चा माल म्हणून उपयोग करतात हें प्रसिद्धच आहे. उत्तर प्रदेशांत साखरेचे कारखाने बहुंशानें केंद्रित झालेले असल्यामुळें तेथेंच पॉवरअल्कोहलचे कारखाने निघणें साहाजिक आहे. पण ह्या दोन धंद्यांत एक महत्त्वाचा फरक आहे. साखरेचे कारखाने हंगामांतच चालतात, तर पॉवरअल्कोहलचे कारखाने सर्व वर्षभर चालतात. चालू वर्षी उत्तर प्रदेशांतील साखरेचे कारखाने उत्पादनांत उच्चांक गांठतील असा अंदाज आहे. अर्थातच, पॉवरअल्कोहलच्या उत्पादनाला लागणारी मळी अधिक प्रमाणांत उपलब्ध होण्याची शक्यता आहे. तथापि तिचा उपयोग करून घेऊन पॉवर अल्कोहलचें उत्पादन वाढविण्यांत येईल असा संभव मात्र दिसत नाहीं. कारण, उत्पादन वाढलें तरी पॉवरअल्कोहलच्या खपाला हुकमी बाजारपेठ उपलब्ध करून देतां येईल अशी सरकारला खात्री वाटत नाहीं. बाजारपेठांच्या संकुचितत्वामुळें उत्पादन–क्षमता असतांनाहि उत्पादनावर कसा विपरीत परिणाम होऊं शकतो ह्याचें हें एक उदाहरण आहे. त्याच बरोबर, राज्य–सरकारांचीं आर्थिक धोरणें परस्परांना पूरक नसल्यामुळें कसे प्रश्न उत्पन्न होतात तेंहि चांगलें दिसून येतें.

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.